लोकमत

# 'विश्व २००९' परिसंवाद १८ डिसेंबरला

दिनांक ११-१२-२००९ वेळ २:५६:४४

मुंबई, दि. १० (प्रतिनिधी) - इको फ्रेंडली व्यवसाय निरसनला पाठबळ देण्यासाठी 'विश्व २००९' हे तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय प्रदर्शन १८ ते २० डिसेंबरदरम्यान मुंबईत आयोजित करण्यात आले आहे. हा कार्यक्रम इन्स्टिटय़ूट फॉर वेदिक सायन्सेसद्वारे प्रायोजित आहे. माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आणि मुख्य वक्ते असतील.

प्रभादेवी येथील रवींद्र नाटय़ मंदिरमध्ये चालणाऱ्या तीन दिवसीय परिसंवादात हरित चळवळ सुरू करण्यात प्रसारमाध्यमांची भूमिका, शिक्षण आणि पर्यावरण, हरित शक्ती निर्माण करण्यात माहिती तंत्रज्ञानाची भूमिका, हरित धोरणांचे उद्योगक्षेत्रात होत असलेले पालन, इको आर्किटेक्चर, हरित प्रकल्पांमधील गुंतवणूक आदी विषयांवर चर्चा होणार आहे.

पर्यावरण व्यवस्थापन केंद्राचे डॉ. प्रसाद मोडक, टीसीएस, इकॉलॉजीकल सस्टेनेबल सर्व्हिसेसचे प्रमुख एस. लक्ष्मी, ग्रीनपीसचे सचिन सिंग, चित्रा विश्वनाथन आदी वक्त्यांचा समावेश असणार आहे. साध्या सूक्ष्म जीवांपासून क्लिष्ट रचना असलेल्या मानवापर्यंत सर्व पृथ्वीमातेच्या स्त्रोतांचा वापर करत असून त्याचा पृथ्वीवर परिणाम होत असतो. गेल्या अनेक वर्षांत वापर करण्याच्या आपल्या वाईट वर्तणुकीमुळे जग एका अशा वळणावर आले असून जिथे ग्लोबल वॉर्मिंग, वातावरणात बदल, जंगलांचा ऱ्हास, ऊर्जा संकट, प्रदूषणात होत असलेली वाढ आणि जीव नष्ट होण्याचा धोका निर्माण झाला आहे. या अनुषंगाने हा विश्वव्यापी परिसंवाद महत्त्वाचा ठरू शकतो.